# भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका

## बांधकाम विभाग

**विषय – नाले गटार मो-या बांधणे या लेखाशिर्षामध्ये पुनर्विनियोजन करणेकामी अर्थसंकल्पीय तरतूदीचे शासकीय ठराव करुन घेणेबाबत.**

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम ६३,६६,६७ (क),९०,३१९ कलम अन्वये जनतेच्या सेवेसाठी किंवा सुरक्षिततेसाठी मा.स्थायी समितीच्या मान्यतेने भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रात विविध ठिकाणी विकास कामे करण्यासाठी आर्थिक तरतूद करणे हे मा.आयुक्त सा.ो. यांचे अधिकार आहेत. त्याप्रमाणे या अधिनियमाच्या कलम ९५ व ९६ प्रमाणे दरवर्षी उत्पन्न व खर्च करण्यासाठी लेखाशिर्ष निहाय तसेच बाब निहाय आर्थिक तरतूद करण्यात आली होती. या तरतूदी मधून आतापर्यंत खर्च झाल्याचा तपशिल खालील प्रमाणे.

| अ.क्र. | लेखाशिर्षकाचे नाव | सन २०२३-२४ करीता करणेत आलेली तरतूद | दि.१७/८/२०२३ पर्यत नोंदविलेली तरतूद रककम | दि. १७/८/२०२३ पर्यंतची शिल्लक तरतूद रक्कम |
|---|---|---|---|---|
| १ | नाले गटार मो-या बांधणे | रु. ५००.०० लक्ष | रु.५००.०० लक्ष | रु.०.०० लक्ष |
| | एकूण | रु. ५००.०० लक्ष | रु.५००.०० लक्ष | रु.०.०० लक्ष |

सन २०२३-२०२४ या वित्तीय वर्षाचा जो अर्थसंकल्प मंजूर झाला त्या अर्थसंकल्पामध्ये नाले गटार मो-या बांधणे या लेखाशिर्षामधील निधी संपलेला आहे. मात्र खालील विषयांकित काम करणे अत्यंत गरजेचे आहे. विषयांकित कामाची रक्कम रु. ९.९० लक्ष होत आहे. तरी खालील कामाकरीता वरील लेखाशिर्षामध्ये "महापालिका इमारती बांधणे " या लेखाशिर्षामधुन रु. ९.९० लक्ष रुपयाचे पुनर्विनियोजन करुन निधी उपलब्ध झाल्यास खालील विकास काम करता येईल.

| कामाचे नाव | रक्कम | शेरा |
|---|---|---|
| प्रभाग समिती क्र.१ अंतर्गत वार्ड क्र.३ गायत्रीनगर मधील बबलू पंडीत यांच्या घरापासून ते मनपा शौचालयापर्यंत गटार पाथवेज तयार करणे. | रु. ९,८९,८९७/- | |
| **एकूण** | **रु.९,८९,८९७/-** | |

**खालील लेखाशिर्षामधून पुनर्विनियोजन करावयाचे आहे.**

| अ. क्र. | लेखाशिर्षाचे नाव | सन २०२३-२४ करीता करणेत आलेली तरतूद | दि.१७/०८/२०२३ पर्यत नोंदविलेली तरतूद रककम | दि. १७/०८/२०२३ पर्यंतची तरतूद शिल्लक | पुनर्विनियोजना करीता घ्यावयाची रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| १ | महापालिका इमारती बांधणे | रु.१००.०० लक्ष | रु.८६.०३ लक्ष | रु.१३.९७ लक्ष | रु.९.९० लक्ष |
| | एकूण | रु.१००.०० लक्ष | रु.८६.०३ लक्ष | रु.१३.९७ लक्ष | रु.९.९० लक्ष |

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ कलम १०२,कलम १०३ व कलम १०४ अन्वये एखादया लेखाशिर्षाखाली रक्कम खर्च झाली नाही व त्यात बचत झाली तर या नियमाच्या आधारे अनुदानाच्या तुलनेत जादा होणारा खर्च बचतीच्या रक्कमांचा उपयोग करून भागवीता येवू शकतो व असे पुनर्विनियोजन करण्याचे अधिकार मा.आयुक्त सो यांचे मान्यतेने मा.स्थायी समितीस सादर करणे आवश्यक आहे. मात्र सध्या स्थायी समितीचे अधिकार मा.प्रशासक तथा आयुक्त सा ो. यांच्याकडे निहीत आहेत.

नाले गटार मो-या बांधणे या लेखाशिर्षामध्ये "महापालिका इमारती बांधणे" या लेखाशिर्षामधून रु.९.९० लक्ष रुपयाचे पुनर्विनियोजन करणे आवश्यक असून त्याचा स्वतंत्र नमूना क्र.१० नियम ३० (३) प्रस्ताव तयार केला आहे. त्यास मा.प्रशासक तथा आयुक्त सा ो. यांनी दिनांक ६ /०९ /२०२३ रोजी मान्यता दिलेली आहे. तरी यासाठीचा प्रशासकीय ठराव मंजुर करुन घ्यावा ही विनंती.

**ठराव क्र.** २५९

**दिनांक** ०३ /१० /२०२३

भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रातील प्रभाग समिती क्र.१ अंतर्गत वार्ड क्र.३ गायत्रीनगर मधील बबलू पंडीत यांच्या घरापासून ते मनपा शौचालयापर्यंत गटार पाथवेज तयार करणे. विषयांकित काम करणे अत्यंत गरजेचे असल्याने नाले गटार मो-या बांधणे या लेखाशिर्षामध्ये तरतुद रक्कम (निधी) नसल्याने काम करता येणे शक्य नाही. सबब"महापालिका इमारती बांधणे" या लेखाशिर्षा मधून रु.९.९० लक्ष रुपयाचे नाले गटार मो-या बांधणे या लेखाशिर्षामध्ये निधी उपलब्ध करुन देणेकामी रु.९.९० लक्ष रुपयाचे पुनर्वियोजनाने निधी वर्ग करणेस महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील शासन निर्णय क्र.एमसीओ-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२) नवि-१४ दि.६ जुन २०२२ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार मी श्री.अजय वैद्य, प्रशासक तथा आयुक्त उपरोक्त शिफारस केल्याप्रमाणे मान्यता देत आहे.

(अजय वैद्य)
**प्रशासक तथा आयुक्त**
**भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका**

c.9e

नमुना क्र.१०

नियम ३० (३) पहा

भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका,भिवंडी

| या लेखाशिर्षातुन | | | | | | या लेखाशिर्षाकरिता | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| अ.क्र | प्रधान,गौण व तपशिलवार माहिती | बांधकाम विषयक सेवा व इतर | मुळ अनुदान पर्यत खर्च | आज तारखे पर्यत खर्च | उपलब्ध शिल्लक | प्रधान,गौण व तपशिलवार माहिती | बांधकाम विषयक सेवा व इतर | मुळ अनुदान पर्यत खर्च | आज तारखे पर्यत खर्च | प्रस्तावित वाढीची रक्कम खर्च | अभिप्राय |
| १ | भांडवली खर्च भाग-४ | अ/२/१ महापालिका इमारती बांधणे | सन २०२३-२४ करीता रु.१००.०० लक्ष | सन २०२३-२४ करीता रु.८६.०३ लक्ष | सन २०२३-२४ करीता रु.१३.९७ लक्ष | भांडवली खर्च भाग-४ | अ-१/१/१ नाले गटार मो-या बांधणे | सन २०२३-२४ करीता रु.५००.०० लक्ष | सन २०२३-२४ करीता रु.५००.०० लक्ष | रु.९.९० लक्ष | महापालिका इमारती बांधणे या लेखाशिर्षामधुन रु.९.९० लक्ष रुपये नाले गटार मो-या बांधणे या लेखा मध्ये पुनर्विनियोजनाने रककम वर्ग करणेत येत आहे. |
| | | एकूण | | | | | | | | रु.९.९० लक्ष | |

शहर अभियंता
भिवंडी नि.शहर मनपा

o/c

मुख्य लेखा परिक्षक
भिवंडी नि.शहर मनपा

मुख्य लेखा व वित्त अधिकारी
भिवंडी नि.शहर मनपा

अति. आयुक्त
भिवंडी नि.शहर मनपा

प्रशासक तथा आयुक्त
भिवंडी नि.शहर मनपा